ISSN : 2278-5914


(Inst.Reg. No.Maharashtra/13482/Satara/2010)
Email ID : sisms2010@gmail.com

SATARA ITIHAS SANSHODHAN MANDAL, SATARA

SANSHODHAN

PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

ISSUE - XIV



October 2023

SANSHODHAN संशोधन

PEER REVIEWED पिअर रिव्हयूड

RESEARCH JOURNAL रिसर्च जर्नल

ISSN 2278-5914 ISSN 2278-591

ISSUE - XIV अंक 14 वा

October 2023 ऑक्टोबर 2023

* **Publisher : Prof. Dr. Mrs. Urmila Kshirsagar**
President,
Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara

* Printer : DS Printers, Satara

* **Publication Date : 8th October 2023**

* **Donated Value : Rs. 300 /-**

(All rights reserved under the Satara Itihas Sanshodhan Mandal, Satara) (The views expressed by the authors in 'Sanshodhan' Reaserch Journal in this issue are there own. The editor and publisher are not responsible for them.

अनुक्रमणिका

अ.क्र.	प्राध्यापकाचे नाव	शोधनिबंधाचे नाव	पान क्र.
1.	डॉ. बाळासाहेब आमगोंडा कोटलगी	'प्राकृत साहित्यिक हरिभद्रसुरीच्या कथेतील व्यापारी परंपरा आणि वारसा'	1
2.	डॉ. कारखानीस सागर मुरलीधर	सातवाहनकालीन महाराष्ट्राची आहारसंस्कृती	5
3.	डॉ. नाडगौडा आरती बळवंत	Archaeological sources for the study of the history of Karnataka	12
4.	डॉ. नलिनी अविनाश वाघमारे	Akkamma's Contribution to Vachana Sahitya and Culture	17
5.	प्रिया ब्रिजेश कुलकर्णी	सुरसुंदरी शुकसारिकेचे टिकात्मक परिक्षण	25
6.	शिंदे आदेश राजेंद्र	मध्ययुगीन भारतातील सूफी खानकाहांचे योगदान	30
7.	डॉ. जाधव जनार्दन श्रीकांत	"छत्रपती शिवाजी महाराज यांचे समतेचे धोरण: एक दृष्टिक्षेप"	36
8.	डॉ. मधुकर विठोबा जाधव	छत्रपती शिवाजी महाराजांची स्वतंत्र स्वराज्य प्रतीके	42
9.	घाडगे राजेंद्र मानसिंगराव	शहाजीपुत्र संभाजीराजे भोसले	47
10.	इंदलकर सीमा नवनाथ	पेशवेकालीन स्त्री-जीवन	53
11.	कोणे दिलीप महादू	नाना फडणविसांचे आत्मचरित्र : एक आकलन.	60
12.	भुयेकर पूनम रमेश	मराठेकालीन महाराष्ट्रातील स्त्रियांचे सामाजिक स्थान	66
13.	डॉ. सातपुते राजेंद्र भिमाजी	मराठी राज्याचे स्थैर्य व माधवराव पेशव्यांनी केलेल्या सुधारणा	75
14.	प्रा.जमदाडे निलेश प्रकाश प्रा. डॉ. राजेंद्र सातपुते	छत्रपती शाहू महाराज व निजाम संघर्ष -एक ऐतिहासिक अभ्यास	88
15.	अरविंद आबासो पाटील	सशस्त्र क्रांतीचे जनक वासुदेव बळवंत फडके यांचे कार्य	92

16.	डॉ. कुलकर्णी मंजिरी महेंद्र	अक्कलकोट संस्थानातील जमीनदारांचे बंड 1830	98
17.	नायर अंकिता मोरे यश संदीप	Unveiling The Forgotten Battle of Aberdeen, 1859 (Andaman)	102
18.	अदाटे अमृता विठ्ठल	समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे स्त्रीवादी विचार.	109
19.	डॉ. वैशाली अभिजित सारंग	Begum Shareefa Hamid Ali : One of the Neglected Woman Hero in Indian History	117
20.	डॉ. विधाते गणेश शंकर	भारतीय कामगार चळवळीमध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांचे योगदान	123
21.	डॉ.चंद्रकांत बाबुराव कुंभार	म. गांधीजींच्या विचारातून स्वराज्य लढा	130
22.	श्रीमती सीमा जालिंदर भोसले	धोंडो केशव कर्वे यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे चिकित्सक अध्ययन	135
23.	डॉ. सौ. वंदना रामचंद्र लोंढे	भारतातील स्त्री शैक्षणिक सुधारक पंडिता रमाबाई	138
24.	डॉ. कदम संतोष तुकाराम	डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक व आर्थिक विचारांचे विश्लेषण	142
25.	डॉ. मोरे संभाजी आनंदा	विजयी मराठाकारांचे अस्पृश्यता निवारण कार्य एक मागोवा	150
26.	डॉ.संजीव सुखलाल बोडखे	कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य	154
27.	प्रशांत वसंत रणसुरे	Women's Contribution in Indian Freedom Movement in Pre-Gandhian and Gandhian Era	161
28.	वाघमारे कबीरदास सुदाम	JRD Tata and his Innovative Practices	168

29.	डॉ. कदम चांगुना विट्ठल	एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवनविषयक सुधारणावादातील वृत्तपत्रांचे योगदान	174
30.	डॉ. सुवर्णा प्रकाश पाटील	Indian Freedom Movement and Role of Miraj Princely State.	180
31.	डॉ.मधुरा राजेश कारंडे	कोल्हापूरच्या कामगार चळवळीमधील स्त्रियांचे योगदान	188
32.	डॉ. हरिश पंडितराव भैलुमे	राजर्षी शाहू महाराज व बहुजन शिक्षण चळवळ	193
33.	प्रा. वटाणे कल्याण राजेंद्र	विठ्ठल रामजी शिंदे यांचे अस्पृश्य उद्धाराचे शैक्षणिक कार्य	196
34.	प्रा.श्रीमती रेश्मा काळेल	मानदेशाच्या आर्थिक स्थित्यंतरामध्ये राजेवाडी धरणाची भूमिका	199
35.	प्रा.डॉ.गाढवे किशोर गुलाब	स्वातंत्र्यसैनिक श्री.विष्णू भाऊ डोईफोडे यांचे भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यातील योगदान.	205
36.	डॉ. पवार सुनील दिनकर	भाई प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या नेतृत्वातील लढे एक अभ्यास	211
37.	डॉ. घुले रामचंद्र गुरुलिंग	सत्यशोधकी वाटसरू व मार्क्सवादी योद्धा विचारवंत ; भाई प्रा.डॉ. एन. डी. पाटील	217
38.	संदीप बळवंत गुरव डॉ. सुरेश मारुती चव्हाण	महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीचे तेजस्वी दीपस्तंभ : प्रा. डॉ. एन. डी .पाटील	236
39.	डॉ. चव्हाण सुरेश मारुती	महाराष्ट्राच्या जन आंदोलनातील डॉ एन.डी.पाटील	241
40.	प्रा.झोळे-पाटील प्रियांका विलास	महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला प्रतिष्ठा देणारे नेतृत्व - प्रा.एन.डी.पाटील	245
41.	प्रा. डॉ. देवकाते बी.एन.	विसाव्या शतकातील मराठी वृतपत्राचे लोकजागृतीतील योगदान	249
42.	डॉ. पाटील संगीता संपत	तुफान सेनेचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील कार्य	253

43.	सौ. प्रीती जाधव (पाटील)	प्रो. गजानन माणिकराव यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान	260
44.	डॉ.क्षीरसागर उर्मिला नरसिंगराव	यशवंतराव चव्हाण यांचे सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान	265
45.	डॉ. धीरज सुरेश शिंदे	२१ व्या शतकातील वृत्तपत्रांसमोरील आव्हाने	268
46.	डॉ.वाघमारे अरुणा मधुकर	सायलेंट व्हॅली:१९ व्या शतकातील सामाजिक पर्यावरणवादी चळवळ	275
47.	प्रा. डॉ.सांळुखे यु.ए. श्रीमती भोसले अर्चना	प्रा.डॉ.एन. डी.पाटील यांचा दुष्काळसंदर्भातील लढा	279
48.	डॉ. संदीप नामदेव मिरे	स्वातंत्र्योत्तर भारताच्या भूमिगत चळवळीत कॉ.चंद्रभान बाळाजी आठरे पाटील यांचे योगदान	284
49.	डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे	बहुजन आणि स्त्रियांचा उद्धारकर्ते दिवाणबहादूर अण्णासाहेब लठ्ठे	289
50.	आडलीकर जयवंती मधुकर डॉ. सुरेश विठ्ठल पाथरकर	21 व्या शतकातील विवाहाबद्दलची समाजाची बदलती भूमिका	294
51.	जाधव धैर्यशील मारुती	स्थानिक इतिहास लेखनातील मूलभूत घटक	300
52.	राजगुरू गौतम धनाजी	स्थानिक इतिहास लेखन	303
53.	लुडबे हेमाद्री प्रदीप	Measuring the Mightiest: The story of the Survey of India'.	307
54.	डॉ.खोले सुप्रिया चंद्रशेखर	हुपरीच्या चांदी व्यवसायातील स्थित्यंतरे	314
55.	डॉ. हेमलता मुकणे	लोकशाहीतील एन.जी.ओ. ची भूमिका: पालघर जिल्ह्यातील श्रमजीवी संघटनेचे कार्य	320
56.	श्री. अमोल रावसाहेब बुचुडे	अहमदनगर मधील कारेझ/कनात (भूमिगत पाणी पुरवठा) योजना	326
57.	सुतार श्रीराम ईश्वर	कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभी मध्यम प्रकल्प आणि पुनर्वसन समस्या	335

58.	डॉ. जाधव संतोष हनुमंत	मोखाडा परिसरातील (जिल्हा पालघर) वीरगळ व मूर्तींचा अभ्यास	338
59.	डॉ. टिके अनिल शिवाजी	सण समारंभ यांचे महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनातील स्थान व महत्व	343
60.	डॉ. दत्तात्रय जयसिंग ओवाळे	गाळणा किल्ला एक अभ्यास	348
61.	प्रा. डॉ.संजीवनी बारहाते	परभणी जिल्ह्यातील ऐतिहासिक धार्मिक पर्यटन स्थळे	354
62.	श्रद्धा सुधीर वाघमारे	त्र्यंबकेश्वर येथील दशनामी नागा आखाड्याची पेशवाई	360
63.	डॉ. परीट शिवाजी आनंदा	कोल्हापुरातील फौंड्री उद्योग	365
64.	माने अमोल बिरा	पारधी पुनर्वसनाचा हुतात्मा पॅटर्न	375
65.	प्रा.डॉ.जयपाल चंद्रकांत सावंत	डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जातीयता-अस्पृश्यता यासंदर्भातील काही निवडक ग्रंथसंपदा	380
66.	प्रा.डॉ.चारुशीला लोखंडे	आधुनिक कालखंडातील कल्याणचा व्यापार	389

29. एकोणिसाव्या शतकातील स्त्रीजीवनविषयक सुधारणावादातील वृत्तपत्रांचे योगदान

प्रा. डॉ. चांगुणा विठ्ठल कदम
बी. डी. काळे महाविद्यालय,
घोडेगाव,ता,आंबेगाव.जि, पुणे.

एकोणिसाव्या शतकातील भारतीय समाजात पुरुषप्रधान संस्कृती अस्तित्वात होती. त्यामुळे स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान प्राप्त झालेले होते. स्त्रीजीवन मूलतः स्त्रीशिक्षण, बालविवाह, जरठविवाह, बालहत्या, सतीप्रथा, विधवा विवाह, केशवपन, विवाह संमती वय, मालमत्ताविषयक हक्क, अधिकार, इत्यादी समस्यांनी ग्रासलेले होते. याच कालखंडात ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतात प्रबोधनाला सुरुवात झाली.स्त्री जीवनविषयक प्रश्नांची खऱ्या अर्थाने जाहीर स्वरूपात चर्चा सुरू झाली. तर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हे प्रश्न सोडवण्यासाठी सामाजिक चळवळ सुरू झाली.

मुद्रण कलेचा उदय हा एकोणिसाव्या शतकातील घडून आलेल्या परिवर्तनामधील एक महत्त्वाचा घटक होता. प्रामुख्याने बंगालमध्ये ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर वृत्तपत्रसृष्टीचाही प्रारंभ झाला. राजा राममोहन रा◌ॅय यांनी संवाद कौमुदि (बंगाली) व मिरातल - उल - अखबार (फारसी) ही दोन स्वतः ची वृत्तपत्रे सुरू केली. त्यानंतर भारतात कलकत्ता, मद्रास, मुंबई या इंग्रजी अंमलाखालील मुलुखात वृत्तपत्रांची सुरुवात झाली. कारण इंग्रजी विद्येच्या संपर्कामुळे, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रचारामुळे आपल्या सामाजिक चालीरीतीत बदल करावा अशी जाणीव जागृत होऊन सुधारणेची वृत्ती या काळात महाराष्ट्रातील विचारवंतांत निर्माण झालेली होती. या पार्श्वभूमीवर मूलतः प्रबोधनाच्या हेतूने आपल्या सुधारणावादी विचारांचा प्रसार त्यांनी वृत्तपत्रांच्या माध्यमातून केलेला दिसून येतो.

स्त्रीजीवनविषयक सुधारणावादाच्या अनुषंगाने वृत्तपत्रीय प्रबोधन चळवळीचे विवेचन पुढीलप्रमाणे

'द बॉम्बे दर्पण' - (१८३२ - १८४०) कालानुक्रमे 'दर्पण' या वृत्तपत्राच्या अगोदर मुंबापूर नावाचे वृत्तपत्र सुरू झाले होते. त्याचा पहिला अंक २० जुलै १८२८ रोजी प्रसिद्ध झाला होता. परंतु मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया घालून त्याची थोर परंपरा सुरू करण्याचा मान दर्पणाकडे जातो. दर्पण पत्राचे संपादक बाळशास्त्री जांभेकर हे राजा राममोहन रा◌ॅय यांच्या आधुनिक विचारांनी प्रभावित झालेले होते. बंगालमध्ये राजा राममोहन रा◌ॅय यांनी सुरू केलेले प्रबोधनाचे कार्य व चळवळी तसेच तेथील वृत्तपत्रे यांची माहिती बंगाली भाषा अवगत असल्यामुळे जांभेकरांना असावी असे वाटते. त्याच सुमारास गुजराती वृत्तपत्रे त्यांच्यासमोर मुंबईत प्रसिद्ध होत होती. त्यामुळे वृत्तपत्रांचा प्रभाव त्यांच्या लक्षात येऊन समाजप्रबोधनाचे कार्य त्यांनी आपल्या 'दर्पण' या वृत्तपत्राच्या माध्यमातून सुरू केले. 'दर्पण' मध्ये इंग्रजी मराठी असा मजकूर समोरासमोर येत असे. मूळ मजकूर इंग्रजीत लिहिल्यानंतर त्याचे भाषांतराचे काम बाळशास्त्री जांभेकर करीत असत. पत्र सुरू करण्यामागील उद्देश १२ नोव्हेंबर १८३१ रोजी प्रस्तावात प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यानुसार, "नव्या ज्ञानाचा, पाश्चात्त्य विद्यांचा लोकांना परिचय व्हावा, त्यांचा अभ्यास व्हावा व त्याद्वारा देशाची समृद्धी व लोकांचे कल्याण साधावे

अशी या वृत्तपत्रांची मांडणी करण्यात आलेली होती."१ इसवी सन १८३२ साली या पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाल्यानंतर काही महिन्यातच त्याचे रूपांतर साप्ताहिकात झाले. ऐतदेशीय लोकांनी हिंदुस्थानातील लोक, धर्म आणि विद्या यासंबंधी लिहून पाठविलेला मजकूरही छापून प्रसिद्ध केला जात असे. अशा प्रकारे ज्ञान आणि मनोरंजन यांचा संयुक्त मिलाफ दर्पणामध्ये साधला जाई.

या वृत्तपत्रात नाटकशाळांमुळे स्त्रियांची गुलामगिरी वाढते याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आलेली होती. तसेच स्त्रियांच्या शिक्षणाविषयी बाळशास्त्री लिहितात, "स्त्रियांस विद्या शिकविणे ही गोष्ट मोठी कामाची आहे, कारण ती हिंदुस्थानच्या राहणाऱ्यांची नीती व ज्ञान वाढविण्याच्या उपयोगी आहे."२. ६ जून १८३४ च्या अंकात एका वाचकाने भारतातील वाईट चालीरीतींवर कडाडून टीका केली होती. त्यात त्यांनी म्हटले होते की, स्त्रियांस शिकविल्याने काय लाभ होतील हे तुमच्या लोकांतील बहुतेकांस माहित आहे, पण दुराग्रही चालीमुळे त्या शिकू शकत नाहीत. स्त्रियांच्या स्थितीविषयी खुला पत्रव्यवहार छापण्याचे धाडस बाळशास्त्री जांभेकर यांनी दाखविलेले होते. विद्येच्या अभावी स्त्रिया दुराचरण करतात याची कारणमीमांसा करताना ते म्हणतात, "पुरुषांस भार्या मेली असता पुनर्विवाह करण्याचा विधी सांगितला असे असता स्त्रियांस तो विधी का नसावा? स्त्रियांस तर याप्रमाणे असले तरी सद्विद्याभ्यास असता, तर काहीतरी विवेक धरित्या, तो तर या हिंदुस्थानात सुतरां नाही. हा एक मोठा दोष आहे. असे असता त्या बिचाऱ्या तरी कसे काय करितील?"३

बाळशास्त्री जांभेकर यांच्या 'दर्पण' पत्रात बालविवाह निषेधाची चर्चा होत होती. 'परशुराम क्षेत्रस्थ ब्राह्मण' या नावाने लिहिणाऱ्याने लिहिले की, "लहानपणी मुलींचे लग्न करण्याची चाल या देशात आहे. ते मोडून टाकण्याकरिता या देशाचे मोठमोठाले लोकांस विनंती आहे ही चाल दक्षणी ब्राह्मणांत आणि बनिये तैलंग कोमटी म्हणवितात त्यात आहे. वरकड जातींत मोठ्या कन्याचेच लग्न करितात. ४" बालविवाहात जसे वधूचे वय कमी असे, तसेच विषम विवाहातही तिचे वय कमीच असे. त्याच्या दुष्परिणामाविषयी महाराष्ट्रात 'दर्पण'ने चर्चा सुरु केली होती. त्यांच्या मते यावर उपाय म्हणजे या बालविधवांचे दुष्कृत्य पाहून विचारवंत, लोकहितेच्छू लोकांनी त्यांचा पुनर्विवाह विधी चालविल्यावाचून हा दुराचार मिटणार नाही. यावरून जांभेकर विधवापुनर्विवाहाचा पुरस्कार करताना दिसून येतात. अशा प्रकारे विद्याव्यवहार, ज्ञानप्रसार आणि लोकांचे विचार समाजात पसरविणे हे वृत्तपत्रांचे वैशिष्ट्य जांभेकरांना अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्या दृष्टीने त्यांनी आपल्या वृत्तपत्राद्वारे शिक्षणाचा प्रसार, स्त्री शिक्षण, बालविवाह प्रथा नष्ट करणे, विधवा पुनर्विवाह इत्यादी सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. दर्पण वृत्तपत्र बंद पडल्यानंतर १८४० मध्ये मुंबई अखबार हे वृत्तपत्र सुरू झाले.

मुंबई अखबार - (१८४०)

'दर्पण' नंतर संपूर्ण मराठी वृत्तपत्र म्हणून मुंबई अखबार या वृत्तपत्राचा उदय झाला. दर्पण पत्र ज्या युनायटेड सर्विस गॅझेट मध्ये समाविष्ट करण्याचे जाहीर करण्यात आले होते, त्या पत्राच्या चालक मंडळीनेच मुंबई अखबार हे मराठी पत्र चालू केले होते. या पत्राचा पहिला अंक ४ जुलै १८४० रोजी प्रसिद्ध झाला होता. या वृत्तपत्रामध्ये गाव खात्यासंबंधी नेमणुका या सदरात अधिकाऱ्यांच्या नेमणुका, बदल्या इत्यादी माहिती देण्यात येत असे. स्त्रीजीवनविषयक अनिष्ट परंपरांवर टीका तसेच सुधारवादी

विचारांचा प्रसार, प्रचार या वृत्तपत्राने घडवून आणलेला होता. अल्पावधीतच अखबार पत्र बंद पडले.
त्यानंतर प्रभाकर हे वृत्तपत्र सुरू झाले.

प्रभाकर - (१८४१): प्रभाकर हे साप्ताहिक पत्र २४ ऑक्टोबर १८४१ पासून सुरु झाले. त्याचे संपादक भाऊ महाजन हे होते. भाऊ महाजन हे प्रगतशील विचारांचे पुरस्कर्ते. शुद्धी चळवळ व सामाजिक आंदोलनातील बाळशास्त्री जांभेकरांचे सहकारी होते.

विचारप्रवर्तक लेख हेही प्रभाकर या वृत्तपत्राचे खास वैशिष्ट्य होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची शतपत्रे प्रथम प्रभाकर या वृत्तपत्रातूनच त्यांना प्रसिद्ध मिळालेली होती. १९ मार्च १८४८ रोजी त्यांचे पहिले पत्र प्रसिद्ध झाले. ७ मार्च १८६३ साली शेवटचे समजुती या पत्रात ते लिहितात, 'स्त्रियांना विद्या शिकविल्याने व्याभिचार अधिक वाढेल, मुलगा झाला तर संतोष मानावा.स्त्रियांचा पुनर्विवाह करू नये, कारण की जिच्या प्रारब्धी सुख असेल तिचा नवरा मरणार नाही. जी अभागी तिचा मरतो. अशा जुन्या समजुतींचा त्यांनी समाचार घेतलेला दिसून येतो.

१४ मे १८४८ च्या पत्रात पुनर्विवाहाविषयी विचार मांडताना ते लिहितात, "सांप्रत आपले लोकांमध्ये हा केवढा अनर्थ आहे की, स्त्रियांस पती वारल्यावर पुनरपि लग्न करू देत नाहीत. ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत असे असता पुरुषांस पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई. हा केवढा जुलम आहे".५ यावर सुधारणेचा उपाय सुचविताना ते म्हणतात की, या गोष्टीकडे कर्तव्य भावनेतून पाहणाऱ्या लोकांनी एकत्र जमल्यावर त्यास कोणी विरोध करणार नाही. अशा लोकांनी ब्राह्मणाप्रमाणे धर्माचे आचरण करून अशा हितकारक सुधारणेस विलंब न करण्यास सोयीचे ठरेल. बालविवाहा संदर्भात लोकहितवादी लिहितात, ब्राह्मण लोकांमध्ये लग्नाच्या अतिघाईमुळे कितीतरी आठ वर्षाच्या देखील मुला मुलीचा विवाह घडवून आणला जातो. त्याची परिणती पुढे दोन चार वर्षाच्या आत भर्ता निधन पावून मुलगी विधवा होते. म्हणून त्यांच्या मते, यावर आपल्या लोकांच्या सुधारण्याचा मार्ग म्हणजे विद्या. विद्या म्हणजे ज्ञान. तेणेकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो. पुढे ते असेही लिहितात की, विद्या अधिक होऊन तुमचे पाऊल पुढे पडू द्या. तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ, तर्क व कल्पना यांचे शंभरपट व हजारपट आता चांगल्या विद्या व अधिक कल्पना निघालेल्या आहेत. त्या सर्व पहा.आळसात राहू नका. शिक्षणाअभावी असणारे स्त्रियांचे जीवन, विधवांचे शोषण, बालविवाह, बालवैधव्य, विधवा पुनर्विवाह, धर्म व रूढिचे अवडंबर इत्यादी विषयावर १८५० पूर्वी लोकहितवादी यांनी आपली लेखणी चालविली होती, असे दिसून येते. यातून त्यांनी आपल्या सुधारणावादी विचारांचा पुरस्कार केलेला दिसून येतो. प्रभाकर पत्रात १८४२ मध्ये 'धर्माभिमानी'ने लिहिले, "पुरुषाने सोळा वर्षापलीकडे व स्त्रीने दहावर्षापलीकडे लग्न करावे म्हणजे तेणेकरून स्त्रीस बालवैधव्य प्राप्त होणे क्वचितच घडण्यात येईल व धर्म संरक्षण होईल".६

प्रभाकरच्या दुसऱ्या पत्रात (१८४७) 'हिंदूंचे कल्याण चिंतणारा' या सहीचे पत्र म्हणते, मुलीचे लग्नाचे वय आठ ऐवजी सोळा व मुलाचे बीस असावे. लहानपणी लग्न झाल्याने स्वभावातील भोळे नाडलास. परस्परांत अप्रीति उत्पन्न होते व कधी कधी व्याभिचारालाही प्रेरणा मिळते. तुम्ही आपली शास्त्राप्रमाणे वागता असे म्हणावे तर कलियुगी संन्यास व अग्निहोत्र वर्ज्य असता ती [illegible] असे साफ दिसत आहे; तर सांप्रतची स्थिती पाहून नीट विचार करा आणि ही वेडी कृत्ये [illegible]

शा. लोकहितवादींच्या पत्रातील स्त्रीविषयक विचारांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल. पत्र क्र. २ . लहानपणीच्या लग्नापासूनच्या अडचणी, पत्र क्र.१० - विवाहाविषयी, पत्र क्र. १५ - लग्नाविषयी विचार, पत्र क्र. १०. - विवाहाविषयी, पत्र क्र. ९० - लग्ने, पत्र क्र.१४६ - लग्नाची पूर्वपीठिका, पत्र क्र.१० पुनर्विवाह, पत्र क्र. १६ - विधवा पुनर्विवाहविषयी, पत्र क्र. ७० - पुनर्विवाह, पत्र क्र. ९९ - पुनर्विवाह, पत्र क्र. १०२ - पुनर्विवाह, पत्र क्र.१०४ - पुनर्विवाह, पत्र क्र. १०५, १०६, १०८ - पुनर्विवाह, पत्र क्र. ३० स्त्रियांची स्थिती, पत्र क्र.१६५ हिंदू शास्त्राप्रमाणे स्त्रियांची स्थिती, पत्र क्र. १३ - चालीचे प्रकार.इ.

(१८४२)

ज्ञानसिंधू व ज्ञानोदय ही वृत्तपत्रे एकाच वर्षी १८४२ साली सुमारे चार महिन्यांच्या अंतराने सुरू झाली होती. तात्या छत्रे यांनी ज्ञानसिंधू साप्ताहिक हे मुंबईत सुरू केले होते. त्याचा पहिला अंक ७ फेब्रुवारी १८४२ रोजी प्रसिद्ध झाला होता. प्रभाकर वृत्तपत्रातील विधवा विवाह विषयक संपादकीयावर ज्ञानसिंधूतील लेखनाबद्दल नापसंती व्यक्त केली होती. त्यावर ज्ञानसिंधूकारांनी दिलेले उत्तर असे होते की, प्रभाकर पत्राचा कर्ता आम्हास उपदेश कर्तो त्यास याणे याविषयी ओढून प्रतिष्ठा मिळवण्याचे कारण नाही व आम्ही त्याचे दोष काढण्यास किंवा लिहिण्यास भीत नाही. त्यासही आम्ही आजपर्यंत बहुत वेळी उपदेश केला आहे. तो त्याने मनात ठेवून आपल्या पत्रात काही लोकांनी पाहण्याजोगे लिहीत जावे. केवळ वादास प्रवृत्त करु नये. सारांश. आमचे पत्र कसे व प्रभाकर पत्र कसे हे लोकांच्या दृष्टीस पडतच आहे व पुढेही पडेल. तेव्हा व्यर्थ बोलण्यात काय आहे? पुढे वीरेश्वर छत्रे यांनी पुण्यात मराठी साप्ताहिक काढण्याची आपली महत्त्वाकांक्षा तडीस नेली आणि मित्रोदय नावाचे वृत्तपत्र सुरू केले. ज्ञानसिंधू वृत्तपत्राने स्त्री जीवनविषयक अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरांवर टीकेचे प्रहार करून सुधारणा करण्याचा पुरस्कार केलेला होता.

ज्ञानोदय - (इ.स. 1842)

धर्मप्रसाराच्या निमित्ताने हिंदुस्थानात आलेल्या ब्रिटिशांचे राजकीय स्थान बळकट होऊ लागल्यानंतर ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्मप्रसारासाठी या देशात ठाण मांडण्यास सुरुवात केली होती. त्यानुसार १८१३ मध्ये मुंबईत अमेरिकन मराठी मिशनची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यावेळी मुंबईत मराठी भाषेऐवजी गुजराती भाषेत तर मराठी लोकांकरिता मराठी भाषेत वर्तमानपत्र निघत असत. त्यामुळे मराठीत पत्र काढण्याची कल्पना अहमदनगरच्या अमेरिकन मराठी मिशनच्या लोकांना प्रथम सुचली. रेव्ह. हेन्री बॅलेंटाईन हे ज्ञानोदयाचे पहिले संपादक होते. ज्ञानोदयाचे स्वरूप जरी मासिक असले तरी त्यात अनेक प्रकारच्या विद्या म्हणजे भूगोल विद्या, ज्योतिष शास्त्र, वैद्यक विद्या वगैरे बखर अशा प्रकरणांच्या गोष्टी त्याचबरोबर इतर देशातील घडामोडी आणि त्यासंबंधी मजकूर छापून प्रसिद्ध केला जात असे. याशिवाय ऐतदेशीय लोकांच्या विद्येसंबंधी वाचकांचा पत्रव्यवहार छापून प्रसिद्ध केला जात असे. स्त्रियांचे प्रश्न या संबंधी न करण्याचा निबंध, पोरी विकण्याची चाल, १४ वर्षांच्या स्त्रियेस संन्यास, विधवांची दुर्दशा, ब्राह्मण विधवेचा पुनर्विवाह, मथावून लावलेला पुनर्विवाह, यासंबंधीस सूचना इत्यादी पत्रांचा समावेश होतो.

स्त्रीविद्याभ्यासाच्या दृष्टीने एका स्थानवासी बाईने (अहमदनगर) लिहिलेले पत्र महत्त्वाचे
दिनांक १९ नोव्हेंबर १८५७ साली आपल्या पत्रात त्या लिहितात, "या हिंदुस्थानात आमच्या हि
स्त्रियांस विद्याभ्यास व सुशिक्षा नसल्यामुळे त्या किती नीच अवस्थेत आहेत व त्यांची मने किती
व हलकट गोष्टींनी भरली आहेत त्याविषयी दोन ओळी लिहिल्यावाचून माझ्याने राहवत नाही.
दरबारी स्त्रिया संध्याकाळच्या वेळेस आपल्या दरवाजाबाहेर ओट्यावर बसून रस्त्याने जाणा
येणाऱ्या पुरुषांकडे आपल्या नेत्र कटाक्षाने न्याहाळून पाहत असतात. याचे पागोटे कसे,
अंगरखा कसा, याची शाल जोडी कशी, अशी व्याख्येची भाषणे बोलून परस्पर विनोदाने
असतात. थोडक्यात विद्येच्या अभावी स्त्रिया दुराचरण करतात असा विचार आपल्या पत्रातून
मांडलेला दिसून येतो."७ अशा प्रकारे सामाजिक घडामोडींची माहिती जरी ज्ञानोदयातून प्रसिद्ध
असली तरी स्त्रीजीवन विषयक सुधारणावादाच्या दृष्टीने सांगोपांग चर्चा झालेली दिसून येते.

ज्ञानप्रकाश (इ. स १८४९)

१८४९ च्या काळापर्यंत इंग्रजांनी स्थापन केलेल्या शाळांतून शिक्षण घेणाऱ्यांची संख्या
वाढत होती. त्याच सुमारास ख्रिस्ती मिशन-यांची धर्मप्रसाराची चळवळही पुण्यात सुरु झाली
व्याख्याने, वृत्तपत्रे इत्यादी साधनांच्या द्वारा नव्या मताचे स्वच्छंदपणे पोषण चालू होते. अशा स्थि
पुण्यातील लोकांनी वृत्तपत्रासारखे स्वतःचे साधन ज्ञानप्रकाशच्या माध्यमातून सुरू केले. कृष्ण
त्रिंबक रानडे हे ज्ञानप्रकाश पत्राचे पहिले मालक चालक होते.१२ फेब्रुवारी १८४९ रोजी या पत्र
पहिला अंक प्रसिध्द झाला होता.

ज्ञानप्रकाश पत्र सुरू करण्याची गरज ज्या मंडळींना वाटली ती पुण्याचीच व नवविद्याविभू
मंडळी होती. त्यांनी स्वजागृतीने हे पत्र सुरू केलेले होते. उपयुक्त घडामोडींची माहिती ज्ञानप्रकाश
प्रसिद्ध केली जात असे. स्त्रीविषयक सुधारणावादाच्या दृष्टीने स्त्रियांना योग्य शिक्षण, स्त्रीपुनर्वि
बालविवाह, स्त्रीहत्या, बालशिक्षण, नवीन शिकलेल्या लोकांसाठी धंदेशिक्षण इत्यादी वि
परामर्श घेऊन ज्ञानप्रकाशने सतत मार्गदर्शनाचे काम सुरू ठेवले होते.स्त्रीशिक्षणासंबंधी 'तुम
मित्र' या नावाने साताऱ्याहून ज्ञानप्रकाशकर्ते यांना पाठविलेले पत्र त्यांनी प्रसिद्ध केले त्याचा
असा की, "स्त्रियांना विद्या शिकवावी की नाही यावर वादविवाद करण्यासाठी तारीख २४ रोजी
शाळेत सभा भरली होती. पहिल्याने रा. माधवराव बर्वे यांनी इंग्रजीत संभाषण करून मुलींस
शिकवू नये असे सांगितले. नंतर रा. पिलोबा मांडे यांनी इंग्रजीत भाषण करून असे दर्शविले
मुलींस विद्या शिकविणे अवश्य आहे. नंतर रा. नारायणराव यांनी मुलीस विद्या शिकवू नये या
संभाषण केले, नंतर विनायकराव गोरे यांनी पिलोबा मांडे यांच्या मताप्रमाणे मत दिले व नंतर
त्या विषयावर संवाद झाला.सरतेशेवटी असा निर्णय झाला की मुलींस विद्या शिकविणे
आहे."८

कलकत्त्यातील स्त्रीपुनर्विवाहाची बातमीही ज्ञानप्रकाशातून प्रसिद्ध करण्यात आलेली होती. कलक
ता. १२ डिसेंबर सालगुदस्त रोजी पुनर्विवाह झाला. त्याचा मजकूर असा की, "कलकत्त्यात
यांची मुलगी तीन वर्षाचे वयाची असता बापाने तिचे लग्न करून दिले. तिचा नवरा मृत झाला
तशीच पुढे सहा वर्षे राहिली. तिचे वय नऊ वर्षांचे आहे. तिजबरोबर जोदेनाथ पंडित
लाविले. असे टेलिग्राफ पत्रात लिहिले आहे."९

अशा प्रकारे वृत्तपत्रांनी ज्ञानप्रसारात्मक आणि सामाजिक सुधारणा विषयक लेखन प्राधान्याने प्रसिद्ध केले. मिशनऱ्यांचे धार्मिक हल्ले परतावून लावणे, राज्यकर्त्यांचे अन्यायी धोरण स्पष्ट करणे, राष्ट्रीय जाणिवेला चालना देणे, स्वसंस्कृती विषयी स्वाभिमान जागृत ठेवणे आणि सामाजिक सुधारणांची महती पटवून स्त्री उध्दाराची तळमळ व्यक्त करणे अशी अनेक कामे या काळात वृत्तपत्रांनी केली. परंतु वृत्तपत्र प्रबोधन चळवळीला लाभलेली मर्यादा म्हणजे प्रामुख्याने विचारवंतांनी उच्च वर्गीय स्त्रियांच्या प्रश्नांनाच प्राधान्य दिलेले दिसून येते. १८५० नंतरच्या काळात बदलत्या सामाजिक परिस्थितीचे भान आले. त्यातूनच संस्थात्मक कार्याला वेग आलेला दिसून येतो.

संदर्भ टीपा -

१. रा.के.लेले, 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००४,पृ.६१.

२. मंगल खिंवसरा, 'स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांचा सहभाग', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००५, पृ.१११.

३. ग.गं. जांभेकर (संपा.), बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह, लोकशिक्षण कार्या, पुणे, १९५०, पृ. २९४.

४. श्री. रा. टिळेकर, (संपा.), 'लोकहितवादींची शतपत्रे', उषा प्रकाशन, औंध सातारा, १९४०,पृ.३६७.

५. भा. पां. हिवाळे, (संपा.), 'ज्ञानोदयाची पहिली शंभर वर्षे', अहमदनगर, १८४२, पृ.१२४.

६. कृ.त्रि.रानडे, (संपा.), ज्ञानप्रकाश, पुणे, १८५५, पृ. ५८.

७. कृ. त्रि.रानडे, 'ज्ञानप्रकाश', पुणे, १८५८, पृ.९.

८. रमाबाई रानडे, 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी', अनुभव पब्लिकेशन्स, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९०, पृ. ४०.

९. प्रतिभा रानडे, 'स्त्री प्रश्नांची चर्चा - एकोणिसावे शतक', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९९१. पृ.४६.

१०. विद्युत भागवत, स्त्रीवादी सामाजिक विचार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, २००८.